# विकसित महाराष्ट्र २०४७

## महाराष्ट्राची कामगिरी

महाराष्ट्र हे भारताचे आर्थिक केंद्र (इकोनॉमिक पॉवरहाऊस) आहे. राज्याचा GSDP (राज्याचा सकल देशांतर्गत उत्पाद) २०२४-२५ या आर्थिक वर्षात ४५ लाख कोटी रुपये असण्याचा अंदाज आहे आणि राज्याचा वाटा राष्ट्रीय GDP मध्ये १३.६% इतका आहे. २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याचे उद्दिष्ट गाठण्यासाठी राज्याची सुरुवात आशादायक आहे. वैविध्यपूर्ण आणि लवचिक अर्थव्यवस्था, तसेच मजबूत सार्वजनिक वित्त व्यवस्था आणि संस्थात्मक परिपक्वता यांमुळे राज्याकडे या ध्येयाकडे वाटचाल करण्यासाठी भक्कम आधार आहे:

**स्थिर वित्तीय स्थिती:** महाराष्ट्राची वित्तीय तूट GSDP च्या ३% पेक्षा कमी आहे, जी -वित्तीय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्प व्यवस्थापन॰ (FRBM) कायद्याच्या मर्यादेत आहे.

**GST बाबत उत्कृष्ट कामगिरी:** GST संकलनाच्या बाबतीत (२०२४ मध्ये ३ लाख कोटी रुपयांहून अधिक) महाराष्ट्र भारतातील सर्व राज्यांमध्ये प्रथम क्रमांकावर आहे. तसेच, राज्याचे स्वतःचे कर उत्पन्न (SOTR) हे भारतातील सर्वाधिक उत्पन्नांपैकी एक आहे.

**कर्जाचा कमी बोजा:** राष्ट्रीय सरासरी २५% पेक्षा जास्त असताना, महाराष्ट्राचे -थकीत कर्ज आणि GSDP॰ गुणोत्तर १९% इतके कमी आहे.

**पर्यायी वित्तपुरवठा पद्धतींचा सक्रिय अवलंब:** भारतातील पहिल्या राज्य-स्तरीय InvIT (इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट) ला मंजुरी; सौरऊर्जा आणि जल पुनर्वापरासाठी PCMC द्वारे २०२३ मध्ये २०० कोटी रुपयांचे पहिले -ग्रीन बॉंड॰ जारी; पायाभूत सुविधांमध्ये PPP (सार्वजनिक-खाजगी भागीदारी) तत्त्वाचा वापर (उदा. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, नागपूर मेट्रो).

**महत्त्वाच्या संधी**

**अ. वित्तीय अवकाश (Fiscal Space):** निर्माण करणे: २०२४ या आर्थिक वर्षात महाराष्ट्राच्या महसुली उत्पन्नापैकी ५६% रक्कम (किंवा GSDP च्या ६%) पगार, व्याजाची परतफेड आणि निवृत्तीवेतन यांवर खर्च झाली. अनुदानांवरील खर्च (जो २०२३ मध्ये ४८ हजार कोटी रुपये होता) वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे, आवर्ती (recurring) खर्च कमी करून तो विकास आणि भांडवली गुंतवणुकीकडे वळवण्याची संधी आहे. (आकृती १ पहा)

**ब . गुंतवणुकीची उत्पादकता वाढवणे:** महाराष्ट्राचा सार्वजनिक गुंतवणुकीचा -इन्क्रिमेंटल कॅपिटल आउटपुट रेशो॰ (ICOR) ४.६ इतका असल्याचा अंदाज आहे (विकसित देशांचा ICOR २.५ ते ३ च्या दरम्यान असतो); मोठ्या प्रकल्पांवरील खर्च आणि वेळेत होणारी वाढ (cost and time overruns) याला कारणीभूत आहे. ICOR कमी करण्यासाठी आणि सार्वजनिक गुंतवणुकीद्वारे जलद विकास साधण्यासाठी प्रकल्पांचे मूल्यमापन अधिक काटेकोर करणे, प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी डिजिटलायझेशन करणे आणि -परिणाम-आधारित कंत्राटे॰ (outcome-based contracts) लागू करणे यांसारख्या संधी उपलब्ध आहेत.

**क. पर्यायी वित्तपुरवठ्याची क्षमता वाढवणे:** सध्या महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांपैकी केवळ अल्प भागालाच सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) किंवा मिश्र प्रारूपांद्वारे वित्तपुरवठा केला जातो; वित्तीय मर्यादांवर मात करण्यासाठी आणि सार्वजनिक प्रकल्पांमध्ये नावीन्य व कार्यक्षमता सुनिश्चित करण्यासाठी पर्यायी वित्तपुरवठा साधनांद्वारे भांडवल उभारण्याची संधी आहे.